# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:12.08.2025** **वार:मंगळवार**

1. संसदेत गदारोळातच काही विधेयकांना मंजूरी
2. हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत देशात आणि राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन
3. अन्नदाता शेतकऱ्यांना उर्जादाता बनवणं ही काळाची गरज-केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन आणि
4. पुणे जिल्ह्यातल्या खेडजवळ अपघातात दहा महिलांचा मृत्यू

**संसद**

करकायदे सुधारणा विधेयक 2025 आणि नव्यानं मांडलेलं प्राप्तीकर विधेयक 2025 अशा दोन विधेयकांना काल लोकसभेनं मंजूरी दिली. केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विरोधकांच्या गोंधळातच ही विधेयकं सभागृहात सादर केली. प्राप्ती कराविषयीचे कायदे एकत्रित करुन त्यात सुधारणा करण्याच्या उद्देशानं प्राप्तीकर विधेयक सादर करण्यात आलं आहे. 1961 च्या प्राप्तीकर कायद्यात आणखी सुधारणा करणं आणि वित्त विधेयक 2025 मध्ये दुरुस्ती करणं हा कर सुधारणा विधेयकाचा हेतू आहे. राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक आणि राष्ट्रीय उत्तेजक द्रव्य विरोधी कायद्यातील सुधारणा विधेयकालाही लोकसभेत गदारोळातच मंजूरी मिळाली.

**दिल्ली मोर्चा**

दरम्यान, बिहारमधल्या मतदारयादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाविरोधात काल विरोधी पक्षांच्या नेत्यांनी संसदेपासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत मोर्चा काढला. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, ज्येष्ठ नेते शरद पवार आणि अन्य काही विरोधी पक्षांचे नेते मोर्चात सहभागी झाले होते. विरोधक, निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयासारख्या संवैधानिक संस्थांची प्रतिमा विरोधक मलीन करत आहेत असा आरोप केंद्राय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी केला.

**पीकविमा**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत 35 लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात एकंदर 3 हजार 9 शे कोटी रुपये विमा रक्कम जमा झाली आहे. राजस्थानमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात केंद्रिय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांच्या हस्ते ही रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली.

**हर घर तिरंगा**

आपला तिरंगा राष्ट्रध्वज देशाच्या एकतेचं प्रतिक आहे, असं प्रतिपादन केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी केलं आहे. हर घर तिरंगा अभियानासंदर्भात नवी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते काल बोलत होते. देशातल्या प्रत्येक नागरिकानं या अभियानात सहभागी व्हावं असं आवाहन त्यांनी केलं, राष्ट्रध्वजाबद्दल बोलताना ते म्हणाले......

***जो हम 140 करोड़ भारतीयों के सपनों को उनके अनगिनत बलिदानों की स्मृतियों को एकजुटता और साहस के साथ में घड़े हुए भारत के वादे को और विचार को अपने भीतर समेटकर भारत के लोगों को विकसित भारत का लक्ष्य प्राप्त करने के लिए निरंतर प्रेरित करता है, और सामूहिकता के भाव में बांधता है। आज भी जब घर पर जब व्यक्ति हाथ में तिरंगा लेकर खड़ा होता है, और सम्मान के साथ में अपने घर की छत पर अपने घर की बालकनी पर अपने प्रतिष्ठान में तिरंगे को लहराता है, तो निश्चित रूप से उसके मन में वही भाव होता है ,जो भाव शहीदे आजम भगत सिंह या उस समय के स्वतंत्रता सेनानियों के मन में था।***

**हर घर तिरंगा**

राज्यातही हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. पुण्यात महापालिकेतर्फे उद्या माजी सैनिकांना सन्मानित करण्यात येणार आहे. नाशिकमध्ये काल मानवी साखळी आणि विशाल राष्ट्रध्वज फडकवण्याचा कार्यक्रम झाला. शहरातल्या विविध शाळांमधले विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. हिंगोली जिल्ह्यातल्या औंढा नागनाथ इथं शासकीय योजनांची माहिती देणारं प्रदर्शन

नांदेडच्या केंद्रिय संचार ब्युरोनं आयोजित केलं आहे. चंद्रपूर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागानं देशभक्ती संकल्पनेवर आधारित विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

**हर घर तिरंगा -चित्रपट महोत्सव**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या कथा आणि एकतेचं महत्त्व सांगणाऱ्या चित्रपटांच्या हर घर तिरंगा चित्रपट महोत्सवाला काल दिल्लीसह मुंबई, पुणे आणि चेन्नई इथं प्रारंभ झाला. राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळानं तीन दिवसांचा हा महोत्सव आयोजित केला आहे. मुंबईत या महोत्सवाचं उद्घाटन माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्या हस्ते झालं. या महोत्सवाच्या आयोजनाबाबत बोलताना ते म्हणाले......

***हमारी आजादी के 15 अगस्त आने वाली है तीन दिन और दूर है। पैट्रियोटिक फिल्म फेस्टिवल रखा गया है देश में राष्ट्रीय सर्वोपरी की भावना जो है, उसको जागृत करना, बरकरार रखना, और उस कार्य को करने के लिए बच्चों को खास तौर पे हम एक पैकेज पैट्रियोटिक फिल्म्स का बच्चों को दिखा रहे हैं, ताकि उन सब के लिए नेशन फर्स्ट की जो फीलिंग है वो और सुदृढ़ हो सके।***

**गडकरी**

अन्नदाता असलेल्या शेतकऱ्यांना उर्जादाता बनवणं ही काळाची गरज आहे असं प्रतिपादन केंद्रिय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. जागतिक जैवइंधन दिनानिमित्त प्राज इंडस्ट्रीज संस्थेच्या वतीनं काल पुण्यात बायोव्हर्स उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राज संस्थेचे अध्यक्ष प्रमोद चौधरी उपस्थित होते. जैव इंधन आणि हरित हायड्रोजन उत्पादनाचा वापर वाढला तर भारत ऊर्जा निर्यातदार देश बनेल असा विश्वास व्यक्त करुन गडकरी म्हणाले....

***और हमारा एक ड्रीम है, कि हमारा किसान केवल अन्नदाता नहीं होगा, हमारा किसान ईंधनदाता है, हमारा किसान बिटुमिन दाता है। हमारा किसान हवाई ईंधन भी बना सकता है, बना रहा है, हमारा किसान हाइड्रोजन भी बना रहा है, और आने वाले समय में पावर से लेकर इंधन से लेकर बिटुमिन से लेकर हवाई इंधन तक अगर किसान बनाएगा तो हमारी एग्रीकल्चर सेक्टर की ग्रोथ कितनी बढ़ेगी, एम्प्लॉयमेंट कितना क्रिएट होगा, ग्रोथ में उसका कंट्रीब्यूशन क्रिएट होगा, और आत्मनिर्भर भारत उससे कैसे बनेगा यही बात हमको समझने की आवश्यकता है।***

**महागाई भत्ता-मुंबई**

राज्य सरकारनं कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दोन टक्के वाढ केली आहे. राज्य सरकारमध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तसंच निवृत्ती वेतन धारकांना आता 53 ऐवजी 55 टक्के महागाई भत्ता मिळेल. 1 जानेवारीपासून या महागाई भत्त्याची थकबाकीही ऑगस्टच्या वेतनाबरोबर दिली जाईल. यासंदर्भातला शासन आदेश सरकारनं काल जारी केला.

**स्कूल व्हॅन परवाने**

शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी तसंच रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्याचा परिवहन विभाग स्कूल व्हॅन परवाने वाटप खुले करणार आहे. या बाबतची अधिसूचना लवकरच जारी करण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल दिली.

**तलवार**

नागपूरकर भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या काळातील मराठा सैन्यातील सरदार रघुजी भोसले यांची राज्य सरकारनं लिलावात जिंकलेली तलवार सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी काल लंडनमध्ये जाऊन ताब्यात घेतली. येत्या सोमवारी 18 ऑगस्ट रोजी ही तलवार मुंबईत दाखल होईल.

**गोपीनाथ मुंडे-पुतळा**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. लातूर जिल्हा परिषदेच्या परिसरात हा पुतळा उभारण्यात आला आहे. या कार्यक्रमाला मंत्री पंकजा मुंडे, जयकुमार गोरे, शिवेंद्रसिंह भोसले यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**शिवसेना आंदोलन**

महायुती सरकारमधील कलंकित आणि भ्रष्टाचारी मंत्र्यांची हकालपट्टी करण्यात यावी या मागणीसाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षानं काल राज्यात विविध ठिकाणी आंदोलन केलं. नवी मुंबई, हिंगोली इथं सरकारविरोधी घोषणा देत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केलं.

**ऑलिम्पियाड**

18वी आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धा काल मुंबईत सुरू झाली. या स्पर्धेत 64 देशांमधले 300 विद्यार्थी सहभागी झाले असून त्यांना 140 शिक्षक मार्गदर्शन करत आहेत.

**निधन-सांगली**

ज्येष्ठ रंगकर्मी आणि दिग्दर्शक विनायक केळकर यांचं काल सांगलीमध्ये निधन झालं. ते 84 वर्षांचे होते. सांगली नाट्य चळवळीसाठी गेली 50 वर्षे ते काम करत होते. आपले नाटक योजनेअंतर्गत हौशी कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचं कार्य त्यांनी केलं.

**निधन-नाशिक**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ स्वयंसेवक भीमराव गारे याचं काल नाशिकमध्ये निधन झालं. ते 73 वर्षाचे होते. नाशिक जिल्ह्याच्या आदिवासी भागात आदिवासींना स्वयंपूर्ण करण्यासाठी त्यांनी अनेक प्रकल्प राबवले.

**कुंडेश्वर अपघात**

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात वाहन 100 फूट खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातामध्ये 10 जणांचा जागीच मृत्यू झाला; तर 29 जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातग्रस्त गाडीतील भाविक महिला तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त कुंडेश्वराच्या दर्शनाला जात होत्या. या दुर्घटनेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला असून पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीमधून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी 2 लाख रुपयांची तर जखमींना प्रत्येकी 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनीही या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारतर्फे 4 लाख रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणा केली आहे.

**फेन्सिंग स्पर्धा- हिंगोली**

हिंगोली इथं झालेल्या 27व्या राज्यस्तरीय सब ज्युनिअर फेन्सिंग स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि नाशिक जिल्ह्यातल्या स्पर्धकांनी वर्चस्व राखलं. वैयक्तिक प्रकारात छत्रपती संभाजीनगरच्या वेदांत काळे आणि श्रेया मोइम यांनी पहिला क्रमांक पटकावला. विविध प्रकारात छत्रपती संभाजीनगर आणि साताऱ्याच्या संघांना सांघिक विजेतेपद मिळालं.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्यात सर्वच विभागात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे

.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**